# सोळा सोमवार



जयहिंद प्रकाशन

# सोळा सोमवार व्रत



१) सोळा सोमवार हे श्रीशंकराचे व्रत आहे.

२) हे व्रत केल्याने दु:ख, दारिद्र्य, रोग नाहीसे होतात.

३) हे व्रत मन:पूर्वक व अत्यंत श्रद्धेने केल्यास सुख, शांती, संपत्ती प्राप्त होते. उत्तम आरोग्य लाभते. मनातील सर्व इच्छा पूर्ण होतात.

४) शंकराचे हे व्रत लाभदायक, फलदायी आहे.

५) हे व्रत मनीच्या चिंता दूर करण्यासाठी करावे. हे व्रत केल्याने मनाला समाधान व आनंद मिळतो.

६) एखादी व्यक्ती आपणापासून दूर निघून गेली असेल, तर त्या व्यक्तीची भेट होते. ज्यांना संतती नसेल, त्यांना पुत्र किंवा कन्या प्राप्त होते. कुमारिकांना योग्य पती मिळत नसेल, तर त्यांना मनपसंत पती मिळतो. लग्न होत नसेल तर त्यांचे लग्न होते. व्यापार करणाऱ्यांना व्यापारात भरपूर फायदा होतो. नोकरी नसणाऱ्यांना नोकरी मिळते. नोकरीत बढती मिळते. एखादी व्यक्ती रोगाने हैराण झाली असेल, तर ती व्यक्ती रोगातून मुक्त होते. असे हे मनोरथ पूर्ण करणारे प्रभावी व्रत आहे.

७) या व्रताला श्रावण महिन्यातील पहिल्या सोमवारी सुरुवात करावी. सोळा सोमवार व्रत करून जो सतरावा सोमवार येईल, त्या दिवशी व्रताचे उद्यापन करावे.

८) तसेच हे व्रत श्रावण महिन्यातच नव्हे तर कोणत्याही महिन्याच्या कोणत्याही सोमवारपासून सुरू करता येते. क्रमाने सोळा सोमवार व्रत करून येणाऱ्या सतराव्या सोमवारी व्रताचे उद्यापन करावे.

९) हे व्रत निष्ठेने करावे. व्रत करणाऱ्या व्यक्तीने व्रताच्या दिवशी मनाने आणि शरीराने शुद्ध व स्वच्छ असावे.

१०) व्रत करणाऱ्या व्यक्तीने सकाळी स्नान करावे. सोवळे किंवा धूत-वस्त्र नेसून श्रीशंकराच्या प्रतिमेची मनोभावे पूजा करावी. साष्टांग नमस्कार करावा. फळांचा अथवा शिरा, खीर अशा खोड पदार्थांचा नैवेद्य दाखवावा. नेहमीप्रमाणे आपले काम करावे. मनात श्रीशंकराचे स्मरण करावे.

११) ज्यांना उपास करणे शक्य होणार नाही त्यांनी गूळ, तूप, गव्हाचा रवा ह्या पदार्थांपासून तयार केलेला शिरा किंवा खीर यासारखा पदार्थ खावा.

१२) सायंकाळी स्नान करावे. अंतःकरणपूर्वक श्रीशंकराच्या प्रतिमेची पंचमोपचार पूजा करावी. फुले व तीन पाने असलेले बेल वाहावेत. त्या प्रतिमेसमोर बसून 'सोळा सोमवार' या पोथीचे वाचन करावे. 'कैलासराणा शिवचंद्रमौळी' ही शिवस्तुती म्हणून 'लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा' ही श्रीशंकराची आरती करावी.

१३) आरती केल्यानंतर श्रीशंकराचे ध्यान करावे. श्रीशंकराला आपली इच्छा मनातल्या मनात सांगून ती पूर्ण करण्यासाठी प्रार्थना करावी. नंतर सर्वांना प्रसाद वाटावा.

१४) गव्हाच्या कणकेचा गूळ, तूप घालून चूर्मा करून त्याचा प्रसाद श्रीशंकरासमोर ठेवावा.

१५) व्रत करणाऱ्या व्यक्तीने अर्धा शेर कणकेचा चूर्मा घेऊन उपास सोडावा.

१६) चूर्मा करताना कणकेत मीठ घालू नये. तसेच उपासाच्या पदार्थांतही मीठ असता कामा नये. त्या दिवशी जेवणाच्या इतर पदार्थांतही मीठ घालू नये.

१७) सोळा सोमवार व्रत झाल्यावर सतराव्या सोमवारी व्रताचे उद्यापन करावे. उद्यापनाच्या दिवशी प्रसादासाठी गव्हाच्या पाच शेर कणकेचा चूर्मा तयार करावा. एक भाग देवळात, श्रीशंकरासमोर ठेवावा. दुसरा ब्राह्मणांना देवळात वाटावा. तिसरा भाग घरी आणून कुटुंबातील सर्व मुलामाणसांना व स्वतः प्रसाद म्हणून वाटावा.

१८) उद्यापनाच्या दिवशी पूजेचे साहित्य घेऊन श्रीशंकराच्या देवळात जावे. त्या पूजासाहित्यात अबीर, कुंकू, शेंदूर, हळद, गुलाल, फुले, चंदनाचे गंध, अक्षता, धूप, दीप, कापूर, नारळ, सुपारी, देठाची खायची पाने, बेलाची पाने, नैवेद्य असे एकंदर सोळा जिन्नस असावेत.

१९) श्रीशंकराची षोडशोपचारे पूजा करावी. एकशे-आठ किंवा एक हजार आठ बेलाची पाने वाहावीत. बेलाचे पान तीन पानी असावे. नैवेद्य दाखवावा. आपली इच्छा मनातल्या मनात सांगून ती पूर्ण करण्यास देवाला सांगावे. तशी प्रार्थना करावी.

२०) उद्यापनाच्या दिवशी देवळातून आल्यावर 'सोळा सोमवार' ही पोथी श्रीशंकराच्या प्रतिमेसमोर वाचावी. शिवस्तुती म्हणून आरती करावी. नंतर सर्वांना प्रसाद वाटावा.

२१) जवळपास श्रीशंकराचे देऊळ नसल्यास किंवा देवळात जाणे अशक्य असल्यास ब्राह्मणास घरीच बोलावून श्रीशंकराची षोडशोपचारे पूजा करावी. देवळात करावयाच्या म्हणून सांगितलेल्या सर्व गोष्टी कराव्यात.

२२) ब्राह्मण न मिळाल्यास पोथीवरून किंवा पूजेची ध्वनिफीत लावून सर्व गोष्टी स्वतःच कराव्यात.

२३) कुटुंबातल्या सर्वांनी उद्यापनाच्या दिवशी पंचपक्वान्नांचे भोजन करावे. त्या दिवशी गाईला चारा द्यावा.

२४) मनःपूर्वक, भक्तिभावाने व्रत करणाऱ्यांची इच्छा श्रीशंकर पूर्ण करतात.

२५) मात्र हे व्रत करीत असताना देवाजवळ आपल्या ऐश्वर्याचे, श्रीमंतीचे, वैभवाचे गर्वाने प्रदर्शन करून नये. आपला थोरपणा मनात आणू नये. लीनतेने श्रीशंकराला भजावे. देव भक्तीवर संतुष्ट होतो. तुमच्या ऐश्वर्यावर नाही. म्हणून प्रसंग ओळखून जे योग्य दिसेल तेच करावे. श्रीशंकराची कृपा प्राप्त करून घेण्यासाठी 'सोळा सोमवार' हे व्रत श्रद्धेने करावे.

# सोळा सोमवार कथा

॥ श्रीगणेशाय नमः ॥

वैदर्भदेशी परम पवित्र । अमरावती नामे एक नगर । तेथे शिवालय महाथोर । जे का अपूर्व त्रिभुवनी ॥ १ ॥ तेथे कोणे एके वेळी । शिवपार्वती एके स्थळी । उभयतां येऊनि देउळी । सहजस्थिती क्षण एक ॥ २ ॥ स्थळ रमणीय देखोनि । पार्वती म्हणे शूलपाणी । सारीपाट मांडोनी । खेळो ऐसे वाटते ॥ ३ ॥ मग शिव म्हणे आवश्यक । डाव मांडिला सम्यक । तेथे गुरव पुजारी होता एक । त्यासी गिरिजा काय बोले ॥ ४ ॥ हा डाव कोणी जिंकिला । सत्य सांगे ये वेळा । तव तो गुरव बोलिला । शिवे जिंकिला म्हणोनि ॥ ५ ॥ मग दुसरा डाव मांडिला । खेळता पार्वतीने जिंकिला । अंबा म्हणे असत्य गुरव बोलिला । तरी तू कोडी होशील ॥ ६ ॥ असत्य बोलसी पापराशी । वेगी घेई मम शापासी । तुज कुष्ठ होईल सर्वांगासी । विलंब यासी

न लागे ॥ ७ ॥ यापरी गुरव शापुनी । उभयता गेली कैलासभुवनी । गुरव पाहे अवलोकुनी । अंगीची कांति पालटली ॥ ८ ॥ गुरव मनी चिंता करी । व्याधि जाईल कैशापरी । कोड आंगी दुःख करी । कवण उपाय असे यासी ॥ ९ ॥ तव तेथे अप्सरा सुंदरी । घेवोनि पूजासामग्री । पूजावया शिवगौरी । देउळाभीतरी पातली ॥ १० ॥ तिने पाहिले गुरवाते । तुज कोड जाहले कवण्या अर्थे । गुरव बोले भयभीत चित्ते । गिरिजेने मज शापिले ॥ ११ ॥ हे ऐकोनि अप्सरासुंदरी । म्हणे गुरवा तू चिंता न करी । सोळा सोमवार व्रत निर्धारी । करिता व्यथा जाईल ॥ १२ ॥ मग तो उठोनि पूजा करी । कर जोडोनि विनंती करी । माते हे व्रत झडकरी । मज उकलोनि सांगिजे ॥ १३ ॥ अप्सरा म्हणे अवधारी । तू सोमवाराचे व्रत करी । दिवसा असावे निराहारी । सायंकाळपावेतो ॥ १४ ॥ मग त्या दिवशी सायंकाळी । साग्र पूजावा चंद्रमौळी । धूपदीप इत्यादि सकळी । षोडशोपचारे पूजावा ॥ १५ ॥ मग अर्धशेर कणिक घेईजे । त्याचे भाग अंगारे तीन कीजे । घृतगुळेसहित

भक्षिजे । लवणरहित जाण पां ।। १६ ।। ऐसे सोळा सोमवार व्रत । चालविजे यथास्थित । हे जाहलिया समाप्त । सतरावे सोमवारी करावे ।। १७ ।। कणिक घेइजे पाच शेर । त्याचे भाग अंगारे समग्र । घृतगुळेसी परिकर । चूर्मा तयाचा करावा ।। १८ ।। तो चूर्मा देउळी न्यावा । भावे चंद्रमौळी पूजावा । तिसरा भाग अर्पावा । सदाशिवासी तेधवा ।। १९ ।। दुसरा भाग देउळी वाटिजे । उरला एक घरा आणिजे । तो आपण स्वतः भक्षिजे । कुटुंबासमवेत आदरे ।। २० ।। अप्सरा म्हणे अवधारी । गुरवा हे व्रत तू भावे करी । कुष्ठ जाईल निर्धारी । सत्य सत्य त्रिवाचा ।। २१ ।। ऐकता गुरव करिता जाहला । अंतःकरणापासोनि आचरला । पूर्वदशा अंग पावला । समाप्ति होता कुष्ठ जाय ।। २२ ।। याउपरी एके दिनी । ईश्वरपार्वती मिळोनी । फिरत फिरत मागुत्यानी । त्याच देउळी पातली ।। २३ ।। पूर्वी गुरवासी शाप दिधला । स्मरण झाले पार्वतीला । सापेक्षे पाहोनि गुरवाला । तव कुष्ठ आंगी दिसेना ।। २४ ।। पार्वती पुसे गुरवाप्रती । तुझे कुष्ठ गेले कवणे रीती । येरू बोले

यथार्थ निगुती । श्रेष्ठ व्रतासी आचरलो ।। २५ ।। सोळा सोमवार व्रत करोनि । तोषविली शिवभवानी । त्यांचिये कृपावलोकनी । आंगीचे कुष्ठ लोपले ।। २६ ।। उमा ऐकोनि आश्चर्य करी । एवढी या व्रताची थोरी । मी हे व्रत आचरीन निर्धारी । षणमुख रुसला म्हणोनिया ।। २७ ।। मग हिमनगजा व्रत आचरी । पूर्णव्रताचे अवसरी । स्वामी कार्तिक मनी विचारी । मातेसी रुसणे अयोग्य ।। २८ ।। स्वामी उठोनि तत्काळी । धावोनि आला मातेजवळी । पाहोनि उमा संतोषली । आनंद चित्ती न समाये ।। २९ ।। स्वामी बोले जननीसी । माझे मनी न राहावे तुजपाशी । म्हणोनि असता अरण्यवासी । दिवस काही लोटले ।। ३० ।। आता उद्भवली कल्पना । जावे मातेचे दर्शना । ऐसी व्हावया मनःकामना । कारण काय सांगिजे ।। ३१ ।। मग शैलजा म्हणे पुत्रा श्रेष्ठा । सोळा सोमवार धरोनि निष्ठा । तेणे तुज जाहली उत्कंठा । माझे भेटीची सत्य पैं ।। ३२ ।। ऐकोनि व्रताचे महिमान । स्वामी बोले स्वये आपण । जननी व्रत हे मी करीन । मनःकामना चित्ताची सांगतो ।। ३३ ।।

माझा मित्र एक ब्राह्मण । देशांतरा गेला बहुत दिन । त्याची भेट व्हावयालागुन । इच्छा पोटी वसतसे ।। ३४ ।। या उद्देशे स्वामी कार्तिक । व्रत आरंभीतसे देख । संपूर्ण होता तात्कालिक । फलादेश पावला ।। ३५ ।। रम्य वनी सहजगती । स्वामीने देखिला पंथी । मित्र ओळखोनि ब्रह्ममूर्ती । अष्टांगभावे भेटला ।। ३६ ।। विप्र नवल करी चित्ता । स्वामीप्रती होय पुसता । तुम्ही आम्ही मार्गी चालता । भेटी उभयता नवल हे ।। ३७ ।। मित्रासी म्हणे शिवसुत । मी व्रत आचरलो अद्भुत । तेणे तुझी भेटी सत्य । अकस्मात पैं जाहली ।। ३८ ।। द्विज म्हणे चमत्कार व्रताचा । तरी मी करीन कायावाचा । मज़ स्वार्थ आहे लग्नाचा । म्हणोनि मज सांगिजे ।। ३९ ।। शिवसुत सांगे यथानिगुती । तेचि ब्राह्मण धरी चित्ती । व्रत चालवी यथानिगुती । विदेशी गमन करीतसे ।। ४० ।। व्रत होताचि संपूर्ण । विचित्र कर्माचे गति गहन । मार्गी एक नगर शोभायमान । रम्य अपूर्व देखिले ।। ४१ ।। तेथील राजा पुण्यपवित्र । त्यास एक कन्या सुंदर । तिचे मांडिले

स्वयंवर । पण दुर्धर करोनि ।। ४२ ।। मिळाले राजे अति अद्‌भुत । अठरा वर्णादि समस्त । तयामाजी द्विजनाथ । ते कौतुक पाहू पातला ।। ४३ ।। राये हस्तिनी शृंगारोनी। तिचे सोंडी माळ देऊनी। यथाविधि करोनि। मंडपामाजी सोडली ।। ४४ ।। ती हस्तिनी फिरत फिरत । आली जेथे द्विजनाथ । गळां माळ घालोनि त्वरित । निजमस्तकी बैसविला ।। ४५ ।। पाहोनि राजा आनंदघन। सुखसोहळा लग्नविधान । करूनि वधूवरे दोघे जण । स्वगृहासी बोळविली ।। ४६ ।। उभयतां एकचित्ते करोनि । नांदत असता आपुले सदनी । प्रभुत्व पावली राजनंदिनी । पूर्ववृत्तान्त जाणविला ।। ४७ ।। एकान्तस्थळी समाधानी । उभयता असता सुखसदनी । निवान्त समय पाहोनि । राजकन्या प्रश्न करी ।। ४८ ।। मार्गस्थ असता द्विजोत्तमा । मी कैसेनि प्राप्त जाहले तुम्हा । कोणत्या सुकृताचा महिमा । हे मजलागी सांगिजे ।। ४९ ।। द्विज म्हणे ऐके साचार । व्रत केले सोळा सोमवार । त्या पुण्ये मज साचार । भार्या प्राप्त जाहलीस ।। ५० ।। राजकन्या आश्चर्य करी । व्रत ऐकिले

नवलपरी । हे आचरोनि निर्धारी । चमत्कार पाहू याचा ॥ ५१ ॥ धरोनि पुत्राची कामना । व्रत आरंभिले जाणा । सुफल होताच पुत्ररत्ना । सदाशिवे दीधले ॥ ५२ ॥ शतायुषी आणि शुचिष्मंत । ज्ञानी अनुभवी आणि विरक्त । पुण्यशील प्रतापवंत । पितृसेवेसी सादर जो ॥ ५३ ॥ आज्ञापाळक पुत्र जाहला । देखोनि द्विज संतोषला । म्हणे या व्रताचा प्रताप आगळा । तो मज वर्णिला न जाय ॥ ५४ ॥ पुत्र ज्ञानदशेसी येता । मातेलागी होय पुसता । मी सर्वगुणसंपन्नता । प्राप्त कैसेनि तुम्हाते ॥ ५५ ॥ माता म्हणे पुत्रराया । उत्तम शिवव्रत करोनिया । शूलपाणी तोषवूनिया । मनःकामना पुरविली ॥ ५६ ॥ पुत्र म्हणे मातेलागून । हे व्रत सांगे कृपा करोनि । भक्तिभावे आचरीन । कामना पूर्ण व्हावया ॥ ५७ ॥ माझे मनीचा इत्यर्थ । राज्यासनी बैसावे त्वरित । क्लेशरहित दुःखरहित । काही सायास न करिता ॥ ५८ ॥ मातेसी पुसोनि व्रतविचार । यथोक्त आचरे द्विजवर । तव एके नगरी राजा थोर । वृद्धापकाळ तयाचा ॥ ५९ ॥ तयासी पोटी पुत्रसंतान । नसता एक

कन्यारत्न । तिजलागी वर विचारून । ब्रह्मानंद नेमिला ॥ ६० ॥ कन्या अर्पोनि साचार । विधियुक्त केले स्वयंवर । राज्य देवोनि समग्र । पदी आपुले नेमिला ॥ ६१ ॥ ब्राह्मण राज्य करू लागला । व्रतसंकल्प पूर्ण जाहला । तंव सतरावा सोमवार आला । स्त्रियेसी सांगून पाठविले ॥ ६२ ॥ कणिक पाच शेर घेऊनी । त्याचे तीन अंगारे करूनी । तूपगुळाचा चूर्मा करोनि । सत्वर देउळी पाठविजे ॥ ६३ ॥ तिने ऐकोनि समाचार । म्हणे एवढा राजा थोर । देवळी चूर्मा नेता विचार । थोरपणा कैसेनि वाटे ॥ ६४ ॥ पाचशे रुपये तबकी भरोनि । पाठविले देवळालागोनी । तेणे व्रत भंगले तत्क्षणी । शूलपाणी क्षोभला ॥ ६५ ॥ शिव म्हणे राजाला । तुझे स्त्रीने व्रतभंग केला । राज्यालागी क्षय आला । प्रत्यया येईल तुजलागी ॥ ६६ ॥ तू या स्त्रियेसी घरी ठेविता । सर्वक्षय होईल तत्त्वता । तुझे राज्य रक्षिणे आता । तरी स्त्रीस सर्वथा ठेवू नको ॥ ६७ ॥ मग बोले प्राचीन प्रधान । तिचे बापाचे राज्य असोन । तिसी द्यावे काढोन । हे तव निंद्य आम्हाते ॥ ६८ ॥ ईश्वर बोले प्रधानासी ।

तरी तू होशील अधमराशी । राज्य बुडेल निश्चयेसी । स्त्रियेसी घरी ठेविता ।। ६९ ।। मग उभयवर्गी विचार करोनी । राजकन्या दिधली काढोनी । ती चालली दीनवदनी । बहुत खेद करीतचि ।। ७० ।। दुःखित मानसी चिंताक्रांत । चरणी चालली दूर पंथ । नगर देखिले अकस्मात । माजी सुंदरा प्रवेशली ।। ७१ ।। दुर्बळ म्हातारीचे घरी । तेथे राहिली राजकुमारी । म्हातारी म्हणे ऐक नारी । एक कार्य तुजप्रति सांगत्ये ।। ७२ ।। चिवटे आणावी विकोनी । तुज मी काही देईन साजणी । अवश्य म्हणोनि राजनंदिनी । चिवटे विकू निघू लागे ।। ७३ ।। शिरी चिवटे ठेविली बांधोन । अकस्मात अद्भुत प्रभंजन । वारियाने चिवटे गेली उडोन । आली परतोन घरासी ।। ७४ ।। म्हतारीस म्हणो लागली । की चिवटे अवघी उडाली । मग म्हातारी काय बोलली । तू जाय शीघ्र येथोनि ।। ७५ ।। तेथून राणी चलली । तेलियाचे घरी राहिली । तेथेही होणार गति जाहली । ते चतुरी परिसिजे ।। ७६ ।। चार घागरी भरोनि तेलियाने । ठेविल्या होत्या तेलाने । तिने पाहता रितेपणे । तेल अवघे

उडाले ।। ७७ ।। मग तेली म्हणे झडकरी । तू जाय आता कृपा करी । तू असता आम्ही भिकारी । होऊ ऐसे वाटतसे ।। ७८ ।। तेली मनी आश्चर्य करी । तेल उडाले कैशापरी । ही बाई येताच घरी । इच्याने नाहीसे दिसतसे ।। ७९ ।। तेलियाने बाहेर घातली । ती नदीतीरी चालली । तव नदी सर्व आटोनि गेली । पापयोग्य जाण पां ।। ८० ।। मग ती हिंडे वनात । तव सरोवर देखिले अकस्मात । जळ निर्मळ उचंबळत । पाहून संधी पातली ।। ८१ ।। दृष्टि पडता जळावर । माजी किडे पडले समग्र । आसमंतीचे गुराखी सत्वर । गायी जळप्राशनार्थ आणिल्या ।। ८२ ।। मुले जळप्राशन करिती । तव किडे देखिले अवचिती । तेही जळ त्यागूनि जाती । किडे पडले म्हणोनि ।। ८३ ।। गोसावी राहत होता वनी । तो आला उदकालागुनी । एकटी पाहूनि राजनंदिनी । घेऊनि गेला आश्रमा ।। ८४ ।। गोसावी बोले तिजलागुन । तू मजलागी कन्येसमान । तुज नाही अन्नवस्त्राची वाण । स्वस्थचित्ते राहावे ।। ८५ ।। मग तेथे राहिली सुंदरी । घरधंदा सर्व करी । व्रतभंगाच ऐसी थोरी । नाना दुःखे





भोगवीतसे ।। ८६ ।। अन्नोदकासी हात लाविता । त्यामाजी किडे होती तत्त्वता । पाहोनि गोसावी चित्ता । आश्चर्य करू लागला ।। ८७ ।। आता कवण उपाय करावा । इचे पदरी कोण दोष जाणावा । काही एक यत्न करावा । जेणे परिहार होईल ।। ८८ ।। मग आरंभिले अनुष्ठान । तेणे शिव जाहला प्रसन्न । माग म्हणे वरदान । जी का अपेक्षा तुझे मनी ।। ८९ ।। मग गोसावी विनवी ईश्वरास । इचे पदरी काय आहे दोष । तो मज सांगिजे अवश्य । कृपा करोनि स्वामिया ।। ९० ।। शिव म्हणे सोळा सोमवार व्रत । इने भंगिले माझे सत्य । त्या दोषास्तव दुःख प्राप्त । दशा ऐसी जाण पां ।। ९१ ।। गोसावी म्हणे उमापती । तू कृपाळू होऊनि निश्चिती । दोष परिहरोनि महासती । पूर्वस्थिती करावी ।। ९२ । शिव म्हणे सोळा सोमवार केलिया । इचे दोष पावती विलया । ही निर्दोष होऊनिया । आपुल्या स्वामीस भेटेल ।। ९३ ।। ऐसे बोलोनि शूलपाणी । गेला आपुल्या स्वस्थानी । व्रत करिती जाहली कामिनी । काही एक दिवस ।। ९४ ।। तव तिचे भ्रतारासी ।

स्मरण जाहले बहुता दिवसी । स्त्री कोठे असेल वनवासी । शोध तिचा करावा ।। ९५ ।। देशोदेशी हेर पाठविले । हिंडतहिंडत त्या वनासी आले । त्यांनी राजस्त्रियेते ओळखिले । मागो लागले गोसावियासी ।। ९६ ।। तो काही न बोले वचन । हेर गेले परतोन । राजापाशी वर्तमान । सांगता राजा हर्षला ।। ९७ ।। आपण आणि प्रधान । दोघे चालिले न लागता क्षण । थोर समारंभे येऊन । गोसावी नमिला साष्टांगी ।। ९८ ।। परस्परे क्षेमालिंगन । वस्त्रे भूषणे देऊन । मृदुभाषणे समाधान । योगीश्वर तोषविला ।। ९९ ।। म्हणे राजेंद्रा अवधारी । माझी कन्या हे निर्धारी । आजवरी पाळिली माहेरी । आता तुम्ही पाळिजे ।। १०० ।। ऐसे बोलोनि ते अवसरी । सती दिधली राजाचे करी । राजा उठोनि नमस्कारी । गोसावियासी तेधवा ।। १०१ ।। आपुली स्त्री हाती धरोनी । बैसविली सुखासनी । आपण तुरंगी आरुढोनी । निज नगरा परतले ।। १०२ ।। वाजतगाजत आपुल्या स्थळा । येवोनि महोत्सव केला । दान दक्षिणा ते वेळा । देऊनि ब्राह्मण तोषविले ।। १०३ ।। राजाराणींची भेट




जाहली । आनंदे राज्य करू लागली । सकळ प्रजा आनंद पावली । महिमा अगाध नेणवे ।। १०४ ।। ऐसे जो व्रत करील वरिष्ठ । त्यासी कृपाळू होऊनि नीळकंठ । दोष दरिद्र क्लेश संकट । निवारील क्षणार्धे ।। १०५ ।। जो कोणी मनःकामना धरून । आदरे व्रत करील संपूर्ण । त्याने मनोरथ होतील पूर्ण । शिवकृपेने सत्यत्वे ।। १०६ ।। म्हणे राघव व्यंकटेश साचार । मजसी जाहला चमत्कार । भाव धरिल्या साचार । सर्व कामना सिद्ध होती ।। १०७ ।। आरोग्यवृद्धि आणि धन । पुत्रपौत्रकन्यारत्न । इच्छिली इच्छा परिपूर्ण । व्रत करिता पावेल ।। १०८ ।। सोळा सोमवारकथा अनेक । श्रवण पठण करिती देख । त्या प्रसन्न उमानायक । निःसंशय जाण पां ।। १०९ ।। श्रीव्यास विनवी श्रोतयाप्रती । ही कथा पूर्वापार निश्चिती । नूतन नव्हे कवण कल्पिती । चतुरी सत्य जाणिजे ।। ११० ।।

।। इति श्रीसोळा सोमवारकथा संपूर्ण ।। श्रीशंकरार्पणमस्तु ।।

* * *